जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 6 JUN 2021
पुढारी

# विद्यापीठातर्फे ३१४ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आजअखेर विविध अभ्यासक्रमांच्या ३१४ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत. मंगळवारी दहा परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. यात बी.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी सत्र-३ व ४, एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री सत्र-१, एम.एस्सी. फिजिकल केमिस्ट्री सत्र- १, बी.एस्सी., एम.एस्सी. नॅनो सायन्स सत्र-५, एम.कॉम. भाग-१ सत्र-१ आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 6 JUN 2021
सकाळ

# 'महाविद्यालय व्यवस्थापन' हा ग्रंथ मार्गदर्शक : डॉ. शिर्के

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : 'महाविद्यालय व्यवस्थापन' हा ग्रंथ उच्चशिक्षणातील सर्व घटकांना पायाभूत मार्गदर्शन करणारा संदर्भग्रंथ आहे. महाविद्यालयीन व्यवस्थापनाची निगडित अनेक बाबींची मुद्देसूद मांडणी केलेली आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते. शिक्षक नेते माजी आमदार बी. टी. देशमुख प्रमुख उपस्थित होते. प्रा. सुधाकर मानकर यांनी पुस्तक लेखनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी पुस्तकाचे मूल्य व महत्त्व विशद केले. ते म्हणाले, की विद्यापीठ व महाविद्यालयांसमोरील व्यवस्थापकीय प्रश्न सोडविण्याचे काम या ग्रंथाच्या माध्यमातून झाले आहे. उच्च शिक्षण दर्जेदार व गतिमान होण्यासाठी हा ग्रंथ सर्वांना उपयुक्त आहे. अशा प्रकारचे हे मराठीतील पहिलेच पुस्तक आहे.

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, की बदलत्या परिस्थितीनुसार शिक्षण क्षेत्रातील बदलांचा सतत मागोवा घेणारे लेखन मानकर यांनी सातत्याने केले आहे. महाविद्यालय व्यवस्थापन हा उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेची व विकासाशी निगडित असणारा महत्त्वाचा विषय आहे.

प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. पुस्तकास उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांची प्रस्तावना आहे. अतुल प्रकाशनाने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.